Index-2( सूची - २ )

सूची क्र.2

01/06/2020

दुय्यम निबंधक : सह दु.नि. नाशिक 4
दस्त क्रमांक : 3490/2020
नोंदणी :
Regn:63m

गावाचे नाव : वडाळा

341/3490

पावती

Original/Duplicate
नोंदणी क्र. :39म
Regn.:39M

Monday,June 01 ,2020
10:53 AM

पावती क्र.: 4424 दिनांक: 01/06/2020

गावाचे नाव: वडाळा
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: नसन4-3490-2020
दस्तऐवजाचा प्रकार : खरेदीखत
सादर करणाऱ्याचे नाव: श्री. सुनील त्र्यंबक जोशी - -

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 8910.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 400.00 |
| पृष्ठांची संख्या: 20 | |
| एकूण: | रु. 9310.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
11:13 AM ह्या वेळेस मिळेल.

सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ Joint Sub Registrar Nashik 4
नाशिक-४.

बाजार मुल्य: रु.891000 /-
मोबदला रु.256250/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 9100/-

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.8910/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH000831639202021E दिनांक: 01/06/2020
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.400/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 3005202001344 दिनांक: 01/06/2020
बँकेचे नाव व पत्ता:

मुळ दस्त परत

दु. नि. नाशिक
वर बांधकाम
जल्यावरील फ्लॅ
vey Number
. दीपक
ळक वाडी,
:-
: फ्लॅट नं. बी
शेक. , ब्लॉक
२
त्तप्रकारनु
nnexed

Index-2( सूची - २ )

01/06/2020

सूची क्र.2

दुय्यम निबंधक : सह दु.नि. नाशिक 4
दस्त क्रमांक : 3490/2020
नोदंणी :
Regn:63m

गावाचे नाव : वडाळा

| | |
|---|---|
| (1)विलेखाचा प्रकार | खरेदीखत |
| (2)मोबदला | 256250 |
| (3) बाजारभाव(भाडेपटटयाच्या बाबतितपटटाकार आकारणी देतो की पटटेदार ते नमुद करावे) | 891000 |
| (4) भू-मापन,पोटहिस्सा व घरक्रमांक (असल्यास) | 1) पालिकेचे नाव:नाशिक म.न.पा. इतर वर्णन :, इतर माहिती: , इतर माहिती: मौजे वडाळा ता. जि. नाशिक येथील स. नं. 101/1 पैकी प्लॉट नं. 61 ते 64 यासी एकूण क्षेत्र 720.00 चौ. मी. या मिळकतीवर बांधकाम केलेली श्री युधिष्टिर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाशिक बी विंग या सोसायटीतील तळ मजल्यावरील फ्लॅट नं. बीजी 03,मजूर बिल्डिंग प्लॅन प्रमाणे फ्लॅट नं. 7 यासी बांधीव क्षेत्र 38.10 चौ. मी.( ( Survey Number : 101/1 ; Plot Number : 61 to 64 ; ) ) |
| (5) क्षेत्रफळ | 1) 38.10 चौ.मीटर |
| (6)आकारणी किंवा जुडी देण्यात असेल तेव्हा. | |
| (7) दस्तऐवज करुन देणा-या/लिहून ठेवणा-या पक्षकाराचे नाव किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता. | 1): नाव:-श्री युधिष्टिर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नाशिक. करिता चेअरमन/सेक्रेटरी श्री. दीपक नागेश राजगुरू - वय:-35; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: रा. रिद्धी पार्क , टिळक वाडी, शरणपूर रोड, नाशिक. , ब्लॉक नं: -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाशिक. पिन कोड:-422001 पॅन नं:- |
| (8)दस्तऐवज करुन घेणा-या पक्षकाराचे व किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश असल्यास,प्रतिवादिचे नाव व पत्ता | 1): नाव:-श्री. सुनील त्र्यंबक जोशी - - वय:-61; पत्ता:-प्लॉट नं: -, माळा नं: -, इमारतीचे नाव: फ्लॅट नं. बीजी 3, श्री युधिष्टीर को. ऑप हौसिंग सोसायटी ली. पांडव नगरी, वडाळा शिवार, इंदिरानगर, नाशिक. , ब्लॉक नं: -, रोड नं: -, महाराष्ट्र, नाशिक. पिन कोड:-422006 पॅन नं:- |
| (9) दस्तऐवज करुन दिल्याचा दिनांक | 01/06/2020 |
| (10)दस्त नोंदणी केल्याचा दिनांक | 01/06/2020 |
| (11)अनुक्रमांक,खंड व पृष्ठ | 3490/2020 |
| (12)बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क | 9100 |
| (13)बाजारभावाप्रमाणे नोंदणी शुल्क | 8910 |
| (14)शेरा | |

सुची क्र. II
नोंदणी नंतरची प्रथम प्रत
अस्सल बरहुकुम नक्कल
सह. दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-४

मुल्यांकनासाठी विचारात घेतलेला तपशील:-: मुल्यांकनाची आवश्यकता नाही कारण दस्तप्रकारनुसार आवश्यक नाही कारणाचा तपशील दस्तप्रकारनुसार आवश्यक नाही

मुद्रांक शुल्क आकारताना निवडलेला अनुच्छेद :- : (i) within the limits of any Municipal Corporation or any Cantonment area annexed to it.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR (CLASS-II)
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नासिक-४, नाशिक

**CHALLAN**
**MTR Form Number-6**

| GRN | MH000831639202021E | BARCODE | | Date | 30/05/2020-14:54:06 | Form ID | 25.1 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | **Payer Details** | |
|---|---|---|---|---|
| Department | Inspector General Of Registration | | TAX ID / TAN (If Any) | |
| Type of Payment | Stamp Duty<br>Registration Fee | | PAN No.(If Applicable) | ADSPJ1246L |
| Office Name | NSK4_NASHIK 4 JOINT SUB REGISTRAR | | Full Name | Sunil Tryambak Joshi |
| Location | NASHIK | | | |
| Year | 2020-2021 One Time | | Flat/Block No. | S. No. 101/1, Plot No. 61 to 64, |
| **Account Head Details** | | **Amount In Rs.** | Premises/Building | |
| 0030046401 | Stamp Duty | 9100.00 | Road/Street | Shri Yudhistir Co Op Housing Society Ltd Nashik, Flat No. BG-03 |
| 0030063301 | Registration Fee | 8910.00 | Area/Locality | Wadala, Nashik |
| | | | Town/City/District | |
| | | | PIN | 4 2 2 0 0 6 |
| | | | Remarks (If Any) | SecondPartyName=Shri Yudhistir Co Op Housing Society Ltd Nashik~CA=256250~Marketval=891000 |
| | | | Amount In Words | Eighteen Thousand Ten Rupees Only |
| Total | | 18,010.00 | | |

नसन–४
दस्त क्र. ( ४४०० /२०२०)
१ — २२

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASHIK-IV

| Payment Details | IDBI BANK | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 69103332020053011140 | 2610425074 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 30/05/2020-14:55:15 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : Mobile No. : 9422252939

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

विभाग क्र. 25.7

दर बांधीव 29,200–घसारा 20% =23,360/चौ. मी.

सरकारी मुल्यांकन रुपये 08,91,000/–

खरेदी किंमत रुपये 02,56,250/–

स्टॅम्प रक्कम रु. 9,100/–

नोंदणी फी रु. 8,910/–

॥श्री॥

# ॲलॉटमेंट डिड (खरेदीखत)

ॲलॉटमेंट डिड आज दिनांक 01 माहे जुन इसवी सन 2020 रोज सोमवार ते दिवशी नाशिक मुक्कामी....

दस्त क्र. 3४९० /२०२० 
२ — ५४



**श्री. सुनिल त्र्यंबक जोशी**
वय : 61 वर्षे, धंदा : सेवानिवृत्ती
पॅन नं. एडीएसपीजे 1246 एल.
रा. फ्लॅट नं. बीजी 3, युधिष्टीर को. ऑप. हौ. सोसायटी, पांडवनगरी, वडाळा शिवार, इंदिरा नगर, नाशिक.

} **लिहुन घेणार**

**:: यांसी :::**

**श्री युधिष्टीर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
नाशिक (नोदणी क्र.एनएसके/(एनएसके)/ एचएसजी/(टीसी)/973/1999.
दिनांक 16/12/1999. तर्फे चेअरमन.....
श्री. दिपक नागेश राजगुरु
वय–35 वर्षे, धंदा– नोकरी.
रा. रिध्दी पार्क, राजीव गांधी भवन जवळ, शरणपुररोड, नाशिक.

} **लिहुन देणार**

**कारणे अॅलॉटमेंट डिड (खरेदीखत) लिहुन व मे. दुय्यम निबंधक सो. नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देतात ते ऐसा जे की,**

1. **मिळकतीचे वर्णन** :–

(अ) तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक, पैकी **मौजे वडाळा** यागावंचे शिवारातील, नाशिक महानगरपालीका हद्दीतील, रहीवाशी विभागात समाविष्ट असलेली बिनशेती मिळकत यांसी **सर्व्हे नंबर 101/1** पैकी **प्लॉट नं. 61 ते 64** (एकसष्ट ते चौसष्ट) यांसी **एकुण क्षेत्रफळ 720.00 चौ. मी.** क्षेत्रासहच्या प्लॉट मिळकती.

**यांसी एकत्रीत चतु:सिमा येणेप्रमाणे** :–

| | |
|---|---|
| पुर्वेस | : 9.00 मी. कॉलनी रस्ता. |
| पश्चीमेस | : प्लॉट नं. 65. |
| दक्षिणेस | : 7.50 मी. कॉलनी रस्ता. |
| उत्तरेस | : प्लॉट नं. 60. |

येणेप्रमाणे चतु:सिमांकीत वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती जल, तरु, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप व तदंगभुत वस्तुसह जाण्यायेण्याचे वागवहीवाटीचे कॉलनी रस्ते वापरण्याचे हक्कासह दरोबस्त.

(ब) वर कलम 1अ यात वर्णन केलेल्या मिळकतीवर बाधंकाम केलेली **श्री युधिष्टीर** को. ऑप.हौसिंग सोसायटी ली. नाशिक बी विंग या सोसायटीतील **तळ** मजल्यावरील ॲलॉटमेंटप्रमाणे **फ्लॅट नंबर बीजी 03** (मंजुर बिल्डीग प्लॅनप्रमाणे फ्लॅट नं. 07) यांसी **बांधीव क्षेत्र 410.00 चौ. फूट** म्हणजेच **38.10 चौ. मी.** क्षेत्रासहची फ्लॅट मिळकत. (म्युनि. घर नं. 432/0101/युडीआर/03बी/03. इंडेक्स नं. 43200310) **यांसी चतु:सिमा येणेप्रमाणे,**

पुर्वेस : जीना व फ्लॅट नं. 04.

पश्चीमेस : मार्जीनल स्पेस व पाण्याची टाकी.

दक्षिणेस : फ्लॅट नं. 02.

उत्तरेस : मार्जीनल स्पेस.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णन केलेली फ्लॅट नं. बीजी–03 ची मिळकत टॉयलेट, बाथरुम, स्वतंत्र विज केनेक्शन, नळ केनेक्शन, वीज मीटर, कॉमन टेरेस, जिना व पार्कींग वापरण्याचे हक्कसह तसेच इतर सर्व जाणेयेणेचे व वागवहिवाटीचे रस्ते वापरण्याचे हक्कासहची दरोबस्त मिळकत.

2. वर कलम 1अ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती ह्या लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेच्या खरेदी मालकीच्या व कबजे वहिवाटील मिळकती असुन, लिहुन देणार संस्थेने सदरच्या मिळकती, दिनांक 02/03/2000 रोजीच्या वेगवेगळ्या खरेदीखताने विकत घेतलेली आहे. सदरचे खरेदीखत हे मे.दुय्यम निबंधक सो. नाशिक यांचे कार्यालयात अनु. क्र. 2253/2000 व 2247/2000 लगत नोंदविलेले आहे. त्याप्रमाणे 7/12 सदरी मालकी हक्कात लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेच्या नावाची नोंद झालेली आहे. तेव्हा पासुन सदर प्लॉट मिळकती लिहुन देणार संस्थेच्या कबजे, वहिवाटीत व उपभोगात मालकीहक्काने आहे. लिहुन देणार संस्थेला सदर मिळकतीवर बांधकाम करणे व बांधीव भाग सभासदांना विक्री करणे, त्याकरीता कबजा (ताबा) पावती, ॲलॉटमेंट ॲग्रीमेंट, ॲलॉटमेंट डिड व हस्तांतर दस्त/खरेदीखत इत्यादी दस्तऐवज लिहुन व नोंदवून देण्याचा हक्क व अधिकार आहे.

3. वर कलम 1ब यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीवर लिहुन देणार युधिष्टीर को. ऑप. हौसिंग सोसा. ली. नाशिक या संस्थेच्या इमारतीचे बांधकाम करणेकामी नाशिक महानगर पालीकेकडील पत्र क्रमांक नगररचना /एल.एन.डी./ बीपी/बी–4/सीडी /613 दिनांक 28/03/2000 नुसार परवानगी घेतलेली आहे. मंजूर प्लॅननुसार लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम पुर्ण केलेले असुन, त्याप्रमाणे नगररचना विभाग नाशिक महागरपालीका नाशिक यांचे कडील जा. क्र./

दस्त क्र.( ३४९० /२०२०)
४ — ८४



अन्वये बांधकाम पुर्णत्वाचा दाखला नगररचना/002204 दिनांक 12/2002 मिळालेला आहे.

4. वर कलम 1ब मध्ये वर्णन केलेली फ्लॅट मिळकतीबाबत लिहुन घेणार यांनी लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेकडे सभासदत्वासाठी अर्ज दाखल केल्याने त्यांचा संस्थेने अर्ज मान्य करुन, लिहुन घेणार यांना सदर गृहनिर्माण संस्थेचे सभासद करुन घेण्याचे ठरवून, प्रत्येकी पन्नास रुपयाचे एकूण पाच भागाचे भाग प्रमाणपत्र वितरीत केलेले आहे. त्याप्रमाणे लिहुन घेणार यांचे महानगरपालीकेच्या घरपट्टीला व विद्युत वितरण कंपनीचे विज मिटरला लिहुन घेणार यांचे नावाची नोंद झालेली आहे. मात्र लिहुन घेणार यांचे लाभात कोणताही नोंदणीकृत दस्तऐवज झालेला नसल्यामुळे, लिहुन घेणार यांचे विनंतीवरुन लिहुन देणार गृहनिर्माण संस्था ही प्रस्तुतचा ॲलॉटमेंट डिडचा दस्त (खरेदीखत) आजरोजी लिहुन घेणार यांचे लाभात मे. दुय्यम निबंधक सो. नाशिक यांचे कार्यालयात लिहुन व नोंदवून देत आहे.

5. वर कलम 1ब यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीची एकुण उक्ती वर्गणीची किंमत लिहुन घेणार व लिहुन देणार गृहनिर्माण संस्था यांचे दरम्यान रक्कम रुपये 2,56,250/- (अक्षरी दोन लाख छपन्न हजार दोनशे पन्नास मात्र) एवढी ठरलेली असुन, सदर रकमेचा भरणा हा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार संस्थेकडे खालील भरण्यात नमुद केलेल्या तपशिलाप्रमाणे यापुर्वीच दिलेला आहे.

6. लिहुन देणार श्री युधिष्टीर को. ऑप. हौसिंग सोसा. लि. हिचा नोंदणी क्र. एनएसके/(एनएसके)/एचएसजी/(टीसी)/973/1999 दिनांक 16/12/1999 अन्वये नोंदविलेली गृहनिर्माण संस्था आहे. सदर सोसायटीचे चेअरमन/सेक्रेटरी यांनी या दस्तावर सही करुन दस्त लिहुन घेणार यांचे लाभात लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

7. सदर कलम 1ब मध्ये वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीचा खुला व निर्वेध कब्जा लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेने लिहुन घेणार यांना प्रत्यक्ष जागेवर जावून, मोजून मापून, कायम करुन दिलेला आहे. सदरचा कबजा लिहुन घेणार यांनी स्विकारला असुन, मालक म्हणुन कायम केलेला आहे. बांधकामाचा दर्जाबाबत व सोजमापाबाबत लिहुन घेणार यांची काहीएक तक्रार नाही. लिहुन घेणार यांनी सदर फ्लॅट मिळकतीचा उपभोग संस्थेचे उपविधी प्रमाणे व संस्थेचे नियमानुसार करावयाचा आहे.

दस्त क्र.( ३४८० /२०२०)
५ — २२



8. प्रवेश फी व शेअर्स फी लिहुन घेणार यांनी सभासद होणेकामी नियमानुसार भरलेली असुन, लिहुन घेणार हे लिहुन देणार संस्थेचे संस्थापक सदस्य असल्याने सदर संस्थेने महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रउध्योग विभाग यांचेकडून शासकीय व जिल्हा परिषद कर्मचा-यांना घर बांधणीसाठी देण्यात येणारी सवलत घेतलेली असल्याने, खरेदीकामी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी प्रत्येकी 1% आकारलेली आहे.

9. वर कलम 1ब यात वर्णन केलेल्या फ्लॅट मिळकतीबाबत लिहुन देणार खात्रीने व भरवशाने लिहुन देत आहेत की, वर कलम 1ब यात वर्णन केलेली फ्लॅट मिळकतीवर लिहुन घेणार यांनी जी.आय.एस.चे (गट विमा अंतर्गत) महाराष्ट्र शासनाकडून कर्ज घेतलेले होते. सदर कर्जाची व्याजासह परतफेड लिहुन घेणार यांनी केली असुन, तसा नादेय दाखल लिहुन घेणार यांना मिळाला आहे. या व्यतिरीक्त सदर मिळकत ही आजमितीस पुर्णपणे निर्वेध व बोजा रहीत अशी आहे. सदरील मिळकत कोणत्याही प्रकारच्या जडजोखमीत वारंट, पुर्व साठेखत, विसार पावती, या सारख्या अगर तत्सम स्वरुपाच्या जडजोखमीत गुंतविलेली नाही, अगर दान, लिज, लिन, अन्नवस्त्र बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जप्ती जामिणकी अगर तत्सम स्वरुपाच्या जडजोखमीत गुंतवलेली नाही. याहीउपर मिळकतीचा निर्वेधपणाबाबत काही शंका उत्पन्न झाल्यास त्याचे निवारण लिहुन देणार हे त्यांच्या पदरखर्चाने लिहुन घेणार यांना करुन देतील.

10. संस्थेचे दप्तरी जोपर्यंत सदर फ्लॅट मिळकत लिहुन घेणार नावावर आहे, तोपर्यंत मिळकतीचा भोगवटा करण्याचा लिहुन घेणार यांचा हक्क उपविधीतील तरतुदी प्रमाणे राहील. परंतु सदरचा फ्लॅट मिळकत काळजीवाहू तत्वावर देणे किंवा इतर कोणत्याही पध्दतीने फ्लॅट मिळकतीचा ताबा सोडणे त्याचे दुरुस्ती करणे, फ्लॅट मिळकती मध्ये जादा बांधकाम करणे किंवा कोणतेही फेरफार करणे असे करण्याने संस्थेचा इतर कोणत्याही सभासदास गैरसोयीचे होईल असे कृत्य करणेचे टाळावे. संस्थेचे वेळोवेळी आकरुन येणारे मेंटेनन्स चार्जेस वेळोवेळी भरावे.

11. महाराष्ट्र सहकारी संस्थ अधिनियम 1960 व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1961 तसेच संस्थेचे उपविधी या प्रमाणे भाग भांडवल मालमत्तेतील हितसंबध व भाग याचे हस्तांतर तरतुदीनुसार करणेस सभासद म्हणुन मान्यता देणेत येत आहे. ते उपविधीनुसार नेमून दिलेल्या तरतुदी व नियमानुसार आहे, असे समजण्यात येईल व त्यास उपविधीमधील तरतुदीस पात्र राहून रो हाऊसचा भोगवटा उपभोगता येईल.

दस्त क्र.( ३४९० /२०२०)
६ — २२
SEAL OF ... SUB REGISTRAR Class-2 NASHIK-IV



12. फ्लॅट मिळकतीचे वीज मिटरला व महानगरपालीकेच्या घरपट्टीला सभासद /मालक म्हणुन लिहुन घेणार यांचे नावाची नोंद यापुर्वीच झालेली आहे.

13. फ्लॅट मिळकतीची घरपट्टी, पाणीपट्टी, विजेचे बिल, सोसायटीचे मेंटेन्स चार्जेस हे लिहुन घेणार यांचे नावानेच येत आहे. ते त्यांनी विनातक्रार सभासद म्हणून वेळोवेळी भरावयाचे आहे.

14. वर कलम 1ब यात वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही लिहुन घेणार यांना कायमची ॲलॉट केलेली असल्याने, सदरचा व्यवहार उलटवून घेणेबाबत लेखी अगर तोंडी करार लिहुन घेणार व लिहुन देणार संस्था यांचे दरम्यान नाही.

15. वर कलम 1 यात वर्णन केलेले या मिळकतीचे आवश्यक कागदपत्रे असे की, संस्थेचा 7/12 उतारा, इमारत नकाशा, बांधकाम परवानगी, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला, शेअर्स सर्टीफीकीट, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, ईमारत नकाशा व अन्य दस्तऐवज लिहुन घेणार यांना भोगवट्यास दिलेले आहेत.

16. **भरण्याचा तपशील** :-

| रक्कम | तपशिल |
|---|---|
| 2,24,190.00 | अक्षरी रुपये दोन लाख चोवीस हजार एकशे नव्वद मात्र वर्गणीचा भरणा हा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार संस्थेला यापुर्वीच महाराष्ट्र शासनाकडुन गट विमा अंतर्गत (जीआयएस) कर्ज घेऊन, दिलेला आहे. तो भरणा लिहुन देणार संस्थेला यापुर्वीच मिळालेला आहे. |
| 32,060.00 | अक्षरी रुपये बत्तीस हजार साठ मात्रचा भरणा हा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार संस्थेला यापुर्वीच रोख स्वरुपात दिलेला आहे. तक्रार नाही. |
| **2,56,250.00** | **अक्षरी रुपये दोन लाख छपन्न हजार दोनशे पन्नास मात्र.** |

येणेप्रमाणे उपरोक्त फ्लॅट मिळकीचा संपुर्ण भरणा लिहुन देणार गृहनिर्माण संस्थेला लिहुन घेणार यांचेकडुन मिळालेला आहे. फ्लॅट मिळकतीचे किंमतीपोटी लिहुन देणार संस्थेला लिहुन घेणार यांचेकडुन कोणतेही येणे बाकी नाही.

17. प्रस्तुत दस्ताचे अनुषंगाने उपरोक्त कलम 1ब मधील फ्लॅट मिळकती बाबत राज्य अथवा केंद्र सरकारकडून जे जे टॅक्स आकारले जातात अथवा

दस्त क्र.( ३४८० /२०२०)

७ — २२

.7...

भविष्यात आकारले जातील ते सर्व प्रकारचे टॅक्स/कर लिहुन घेणार यांनी भरावयाचे असुन, त्यास लिहुन देणार गृहनिर्माण संस्था जबाबदार राहणार नाही.

18. सदरचे अ‍ॅलॉटमेंट डिड हे लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेवर तसेच त्यांचे पश्चात त्यांचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

19. सदरील फ्लॅट मिळकतीचे अ‍ॅलॉटमेंट डिडकामी सर्व खर्च म्हणजेच स्टॅम्प, लिहणावळ, नोंदनावळ, वकील फी, टाईपींग व झेरॉक्स वैगरे सर्व खर्च हा लिहुन घेणार यांनीच केलेला आहे.

20. लिहुन घेणार यांना युधिष्टीर सोसायटीचे सर्व नियम, अटी व शर्ती, वेळोवेळी होणारे सर्व ठराव लिहुन घेणार यांना बंधनकारक राहतील. तसेच सोसायटीचे निश्चीत केलेले मेंटेनन्स चार्जेस व सोसायटीचा वेळोवेळी आकरुन येणारा खर्च हा लिहुन घेणार यांनी वेळोवेळी देण्याचा आहे.

येणेप्रमाणे प्रस्तुतचे अ‍ॅलॉटमेंट डिड (खरेदीखत) आजरोजी लिहुन देणार यांनी राजीखुशीने व स्वसंतोषाने, कुठल्याही प्रकारची नशपाणी न करता, कुणाचेही दडपणास बळी न पडता, खालील साक्षिदारासमक्ष, वाचुन घेवुन, मान्य व कबुल करुन, सह्या करुन लिहुन घेणार यांचे लाभात लिहुन व नोदंवुन दिला असे.

**हे अ‍ॅलॉटमेंट डिड (खरेदीखत).**

**नाशिक.**





श्री. सुनिल त्र्यंबक जोशी

**लिहुन घेणार**

श्री युधिष्टीर को. ऑप. हौ. सोसा. ली.

नाशिक करीता चेअरमन/सेक्रटरी,

श्री. दिपक नागेश राजगुरु

**लिहुन देणार**

**साक्षीदार :-**

1) ______________

Alok S. Wagh

2) ______________

Ishan Sunil Joshi

महाराष्ट्र शासन

# नोंदणीचे प्रमाणपत्र

या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

[illegible] को-ऑप. हौसींग सोसायटी लि. नासिक

ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९ (१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपरिनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२ (१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १० (१) अन्वये संस्थेचे [illegible] निर्माण संस्था असून उप-वर्गीकरण

[illegible] सह भागीदारी संस्था आहे.

कार्यालयीन [illegible]

सही

(एच. पी. कोतवाल)

उपनिबंधक

सह. संस्था नाशिक तालुका.

[illegible] / (एन.एस.के) / एचएसजी / (टीसी) / ९८३ / १९९९

दिनांक [illegible] /१२/१९९९

---

२००१/२००२ ५० बुके

नाशिक महानगरपालिका, नाशिक

जावक नंबर/नगररचना/ ००२२०८

दिनांक १/१२/२००२

№ 002204

## इमारत बांधकामाचा वापर करणे बाबतचा दाखला (पूर्ण/ ~~भागश:~~)

श्री. चेअरमन श्री युधिष्ठीर सहकारी गृहनिर्माण संस्था

संदर्भ : तुमचा दिनांक १/११/२००२ चा अर्ज क्रमांक : बी३/सी-५५ / ११।११।०२

महाशय,

दाखला देण्यात येतो की, वडाळा शिवारातील सि.स.नं. —— स.नं. १०१/१ पैकी प्लॉट नं. ५ ते ८, ६५ ते ६८ मधील इमारतीच्या तळ + दोन मजल्याचे इकडील बांधकाम परवानगी नं. बीडी ६१३ दिनांक २८/३/२००२ अन्वये दिल्याप्रमाणे सर्व्हेक्षक(आर्किटेक्ट) श्री. रवि [illegible] यांचे निरिक्षणाखाली पूर्ण झाली असून निवासी/ ~~बिनसेत्तर~~/ ~~शैक्षणिक~~ कारणासाठी खालील शर्तीस अधिन राहून इमारतीचा वापर करणेस परवानगी देण्यात येत आहे. त्याचे एकूण बांधकाम क्षेत्र ८३५-३२, ७१५-११, ७१५- चौ.मि. व चटई क्षेत्र (कारपेट एरिया) ६८९-१८, ६१९-८६, ६१९-६५

१) सदर इमारतीचा वापर निवासी/ ~~बिनसेत्तर~~/ ~~शैक्षणिक~~ कारणाकरीताच करता येईल त्या वापरात बदल करता येणार नाही. वापरात बदल करावयाचा झाल्यास इकडील कार्यालयाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

२) घरपट्टी आकारणीसाठी अलाहिदा प्रत मा. कर अधिक्षक घरपट्टी विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहे तरी संबंधित विभागाकडे संपर्क साधावा.

३) सिंगल फेज विज पुरवठा करणेस हरकत नाही.

४) सदरच्या पूर्ण केलेल्या इमारतीत म.न.पा.च्या पूर्व परवानगी शिवाय वापरामध्ये व बांधकामामध्ये बदल करू नये.

[illegible]

कार्यकारी अभियंता

नगररचना,

नाशिक महानगरपालिका, नाशिक

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

क्र. घबांक १६१६/प्र. क्र. ११३०/११- स
सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय,
हौसिंग सेल, न्यु इंडिया ॲश्युरन्स बिल्डींग,
३ रा मजला, म. गांधी मार्ग, बँक ऑफ
इंडीया समोर हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१
दिनांक :- ०७ डिसेंबर, २०१६

## ना देय प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आस्थापना अधिकारी, विक्रीकर सह आयुक्त नाशिक यांच्या सेवाधिन असलेले श्री. सुनिल त्रंबक जोशी हे दिनांक ३१/०१/२०१७ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांना श्री.युधीष्ठीर सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.,) जिल्हा नाशिक या संस्थेमार्फत मंजूर/प्रदान झालेले घरबांधणी कर्ज रुपये २,२४,१९०/-( रुपये दोन लाख चोवीस हजार एकशे नव्वद फक्त) व त्यावरील व्याज रुपये २,१६,५८४/- (रुपये दोन लाख सोळा हजार पाचशे चौऱ्याऐंशी फक्त) त्यांनी या विभागास परतफेड केले आहे.

२. श्री. सुनिल त्रंबक जोशी, यांच्याकडून घरबांधणी कर्ज किंवा त्यावरील व्याज यापैकी काही येणे नाही.

(अ.शं. भुजबळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रत अग्रेषित : -
१ आस्थापना अधिकारी, विक्रीकर सह आयुक्त नाशिक
२ श्री सुनिल त्रंबक जोशी श्री.युधीष्ठीर सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.,) जिल्हा नाशिक
३ अध्यक्ष, श्री.युधीष्ठीर सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.,) जिल्हा नाशिक
४. कार्यासन अधिकारी (१८-स), सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. निवड संग्रह. (१९-स), सहकार पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.

---

## भाग प्रमाणपत्र

युधिष्ठिर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, नाशिक
(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार) पंजीकृत नोंदणी क्र. एनएसके/एनएसके/एचएसजी (टिसी)/८०३/१९८८
अनुक्रमांक ३३.
नोंदणी दि. १६/१२/१९८८.
अधिकृत भाग भांडवल रुपये 50000 भागीकृत 1000 भाग (प्रत्येकी ५० रुपये मात्र)
सभासद नोंदणी क्र. ३३.

प्रमाणित करण्यात येते की श्री./श्रीमती. सुनिल त्र्यंबक जोशी

हे संस्थेचे अधिकृत सभासद आहेत. त्यांनी भाग क्र. १६१ पासून १६५ पर्यंत
रु. २५०/- (अक्षरी) दोनशे पन्नास मात्र
युधिष्ठिर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नाशिक
या संस्थेच्या उपनियमावली नुसार व अशा प्रत्येक एका भागाच्या रकमेचे रुपये ५०/- रोख भरले.
आम्ही संस्थेच्या अधिकृत सही शिक्क्यानुसार नाशिक येथे आपल्या नावे दि. १६/१२/१९८८
ह्या दिवशी करुन देत आहोत.

संचालक | मा.चिटणीस / सेक्रेटरी | अध्यक्ष / चेअरमन

जावक क्र.( ३४८० /२०२०)
९२ — २२
SEAL OF ... NASHIK

शासकीय / जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या
सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थिक मदत.
श्री. युधिष्ठिर सहकारी गृहनिर्माण संस्थांना [म.],
नाशिक, जि. नाशिक या संस्थेला घरबांधणी कर्ज
मंजूरी पहिला हप्ता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक एचएसजी २०००/प्र.क्र.१३३८/पहिला/१८-सी,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- २०.जून. २०००

पहा : १] शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक एचएसजी १०६७/चोवीस, दिनांक ६/१२/१९९७ वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे.

२] शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक एचएसजी १२७१/१०७०/एकतीस, दिनांक १३/९/१९७१ वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे.

३] शासन निर्णय कृषी व सहकार विभाग, क्रमांक एचएसजी १०९०/१५१२०/सीआर-१३/१८-सी, दिनांक ७/२/१९९१ व २०/११/१९९२.

४] एचएसजी १०९३/प्र.क्र. ८/१८-सी, दिनांक २७ ऑक्टोबर १९९३.

५] शासन निर्णय क्रमांक एचएसजी १०९९/५१८८/प्र.क्र. १४/१८-सी, दिनांक २/१२/१९९९.

६] संस्थेचे दिनांक १३/११/१९९९ चे पत्र.

शासन निर्णय :- श्री. युधिष्ठिर सहकारी गृहनिर्माण संस्था [म.], नाशिक जि. नाशिक [ नोंदणी क्रमांक एनएसके/[एनएसके]/एचएसजी/[टीसी]/९७३/९९, दिनांक १६/१२/१९९९ ह्या संस्थेने सादर केलेली घरबांधणी योजना मान्य करुन शासकीय / जिल्हा परिषद सेवेत असलेल्या तिच्या ६७ पैकी ६६ सभासदांच्या वतीने विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे रुपये १,९३,०४,९२०/- [ रुपये एक कोटी त्र्याण्णव लक्ष चार हजार नऊशे वीस फक्त ] कर्ज मंजूर करुन पहिल्या हप्त्यापोटी ३० टक्के रुपये ५७,९१,४७६/- [ रुपये सत्तावन्न लक्ष एक्याण्णव हजार चारशे शहात्तर फक्त ] एवढी रक्कम वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. सदर संस्थेचे चेअरमन व मानसेवी सचिव ह्यांना येथे वर वितरीत केलेली पहिल्या हप्त्याची रक्कम रुपये ५७,९१,४७६/- [ रुपये सत्तावन्न लक्ष एक्याण्णव हजार चारशे शहात्तर फक्त ] ही रक्कम स्विकारण्यास आणि सभासद व संस्थेच्यावतीने कर्जाचे हिशोब ठेवण्यास शासन प्राधिकृत करीत आहे.

३. दिनांक २/१२/१९९९ च्या शासन निर्णयाद्वारे घरबांधणी कर्जाच्या सुधारित मर्यादा विहित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक सभासदास त्याच्या नवीन वेतनश्रेणीतील तसेच मूळ वेतनाच्या ५० पट, किंवा घराच्या अंदाजित रकमेपेक्षा कमी तसेच सदस्याच्या उर्वरित सेवा कालावधीची परिगणना करुन त्यास मिळणारे घरबांधणी कर्जाची रक्कम विचारात घेतली आहे.

- २ -

Scanned by CamSc

४. वरील रक्कम अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथून काढण्यात येईल व अवर सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ हे वरील गृहनिर्माण संस्थेला वितरीत केलेल्या या रक्कमेचे आहरण व संवितरण करतील.

५. सन २०००-२००१ या वित्तीय वर्षासाठी नियत करण्यात येईल तो व्याजाचा दर ह्या कर्जास लागू असेल.

६. कर्जाचे मुद्दल व त्यावरील व्याज सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या पद्धतीने वसूल व समायोजित केले जाईल. तसेच मंजूर करण्यात आलेल्या कर्जाच्या इतर अटी सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे आहेत. कर्ज वसुलीची माहिती परिशिष्ट "क" मध्ये दर्शविली आहे. सर्व सभासदांच्या सेवा पुस्तकं नोंदीचे अहवाल तात्काळ सादर करावेत.

७. ज्यांची शिल्लक सेवा ५ वर्षापेक्षा कमी आहे, अशा सभासदांना मंजूर व वितरीत झालेल्या कर्जाची व त्यावरील व्याजाची वसुली त्यांचा सेवा कालावधी पूर्ण होण्याअगोदर होईल, याची काळजी संबंधित कार्यालयप्रमुखाने घ्यावी. तसेच कर्जाची व त्यावरील व्याजाची परतफेड व्यवस्थितरित्या होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारीही कर्ज वसूल करणा-या अधिका-याची / कार्यालय प्रमुखाची आहे, याची नोंद घ्यावी.

८. या शासन निर्णयाव्दारे मंजूर व वितरित करण्यात आलेल्या रक्कमेबद्दल संस्थेने सर्व सभासदांना लेखी कळवावे. तसेच कर्जाची वसुली प्रत्येक महिन्यास व्यवस्थित होते / नाही हे पाहण्याची जबाबदारी प्रत्येक सभासदाचीसुध्दा आहे, याची जाणीव संस्थेने सर्व सभासदांस लेखी द्यावी.

९. या कारणासाठी होणारा रुपये ५७,९१,४७६/- [ रुपये सत्तावन्न लक्ष एक्याण्णव हजार चारशे शहात्तर फक्त ] हा खर्च खालील शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि तो २०००-२००१ वित्तीय वर्षाच्या त्याखालील मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक व्ही-१४,
६२१६-गृहनिर्माणाकरिता कर्जे,
८०-सर्वसाधारण, ८०० इतर कर्जे,
८०० [एक][ए] शासकीय व जिल्हा परिषद कर्मचा-यांकरिता
सहकारी घरबांधणी संस्थांना कर्जे [ ६२१६०२१२ ]

नसन-४
3800 /2020
93 — 22

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASHIK-IV

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ सु. पां. टेकणे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत :- १] परिशिष्ट अ, ब, क.
२] विवरणपत्र.

**Department of Stamp & Registration, Maharashtra**

Receipt of Document Handling Charges

| | | | |
|---|---|---|---|
| PRN | 3005202001344 | Date | 30/05/2020 |

Received from shri. sunil trimbak joshi - -, Mobile number 9822284446, an amount of Rs.400/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSAR the Sub Registrar office Joint S.R.Nashik 4 of the District Nashik.

**Payment Details**

| | | | |
|---|---|---|---|
| Bank Name | IBKL | Date | 30/05/2020 |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | (१०) | (११) | (१२) | १३ | १४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१) | उपको मुकुंद पठाणे | प्रा. शिक्षिका, गटशिक्षाधिकारी, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ठाणे, ता. मोखाडा, जिल्हा- ठाणे | ५२५० | १/६ १९६३ | १५/१० १९८४ | ३१/५ २०२१ | २,५६,२५० | २,५६,२५० | २,५६,२०० | १८३ | १,४०० | ७६,८६० | |
| ३२) | सुनिता विश्वनाथ मेन्कर | प्रा. शिक्षिका, गटशिक्षाधिकारी, पंचायत समिती, सिन्नर, जि. नाशिक. | ६८५० | ५/६ १९७५ | १/७ १९९५ | ३०/६ २०३३ | ३,१८,७५० | ३,१८,७५० | ३,१८,७२० | ४९२ | १,६६० | ९५,६१६ | |
| ३३) | सुनिल शंकर जोशी | तिरोक टॅकेलक, आस्थापन अधिकारी, विक्रीकर उप-आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे | ७४०० | १/२ १९५९ | २१/१२ १९७९ | ३१/१ २०१७ | २,५६,२५० | २,५६,२५० | २,२४,१९० मंजुर कर्ज | १४१ खाते | १,५२० हाता | ६७,२५७ | |
| ३४) | सोमनाथ गंगाधर हिंगोरे | वाहनचालक, गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जि. प. कार्यालय, ता. मोखाडा, जिल्हा - ठाणे | ५९०० | ११/११ १९४९ | १०/३ १९७३ | ३०/११ २००७ | २,५६,२४० | २,५६,२४० | १,९३,८०० | ७६ | २,५५० | ५८,१३० [जून २००० पासून हप्ता चालू] | |

दस्त क्र. /२०२०

नसन-४

OF THE JOINT SUB-REGISTRAR



Scanned by CamScanner

३८०
९५ २४

शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना कर्जे.
मुद्रांक व नोंदणी शुल्काबाबत...

**महाराष्ट्र शासन**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक :संकीर्ण-७००७/प्र.क्र.१६७/१८-स,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ सप्टेंबर, २००७.

वाचा :-
१. शासन निर्णय क्रमांक एचएसजी-१०६७/XXIV, दि.०६.१२.१९६७,
२. शासन निर्णय क्रमांक एचएसजी-१२७१/१०७०-XXXI, दि.०६.१२.१९६७,
३. शासन निर्णय क्रमांक एचएसजी-१०७३/३९१/F-३, दि.१९.११.१९७३,
४. शासन निर्णय क्रमांक एचबीओ-१०७३/१३२०/F-१, दि.१८.०६.१९७४,
५. शासन निर्णय क्रमांक सीएसएच-२५८३/९१७४/(७३)/१४-सी, दि.०५.१०.१९८३,
६. सहकार आयुक्त कार्यालयांचे पत्र क्र.गृह/डी-३/शास.व जि.प. कर्म/घ.बां.कर्ज/मंजुरी/०७/२४०३, दि.१६ जून, २००७.

**प्रस्तावना :-**

"शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना कर्जे" ही योजना दिनांक ०६/१२/१९६७ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली असून सदर योजना दिनांक १३/०९/१९७१ पासून जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी विस्तारीत करण्यात आलेली आहे.

या योजनेतंर्गत "महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०" खाली नोंदविण्यात आलेल्या शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी घरबांधणी संस्थांच्या सदस्य कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन+अनुज्ञेय महागाई वेतनाच्या ५० पट किंवा जास्तीत-जास्त रू.०७,५०,०००/- किंवा घराची किंमत किंवा कर्ज परतफेडीची क्षमता यापैकी जे कमी असेल तेवढी रक्कम कर्ज म्हणून मंजूर करण्यात येते. या योजनेतंर्गत प्रकल्प खर्च एका संस्थेकरीता कमाल रु.०३.०० कोटीपर्यंत निश्चित करण्यात आलेला आहे. इमारत बांधकामाच्या प्रगतीनुसार कर्ज ३ टप्प्यात वितरीत करण्यात येते. पहिल्या हप्त्याची-३०%

C:\2007_08\LETTERS_07_08/CRNO1672007_STAMP DUTY_EXE_11092007.lwp




SELF ATTESTED

Scanned by CamScanner

रक्कम वितरीत करण्यात येते. त्यानंतर इमारतीचे बांधकाम [illegible] कर्जाचा दुसरा हप्ता-४०% वितरीत करण्यात येते व जोत्याच्या इमारतीचे [illegible] छतापर्यंत पूर्ण झाल्यानंतर सक्षम अधिकारी / संस्था नोंदणी प्राधिकारी यांच्या [illegible] अहवालानुसार कर्जाचा तिसरा हप्ता-३०% वितरीत करण्यात येते.

मुद्रांक शुल्क हे संलेखावर म्हणजेच दस्तऐवजावर आकारले जाते असे दस्तऐवज म्हणजे ज्या दस्तऐवजाने कोणत्याही बाबतीत हक्क, दायित्व, अधिकार प्राप्त झालेले अथवा भविष्यात प्राप्त करुन देणारे लिखाण होय. जर भाग-प्रमाणपत्र हस्तांतरणाच्या माध्यमातून विशेष मिळकतीची मालकी बदलत असेल तर अशा प्रकरणात "मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८" चे अनुसूची १ चे अनुच्छेद २५ प्रमाणे मुद्रांक शुल्क देय होऊ शकते. तथापि, राज्यातील शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना गट विमा योजनेखाली कर्ज मंजूर करण्यात येते हे कर्ज संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा वसूल करण्यात येते. त्यांनी स्थापन केलेल्या घरबांधणी संस्थेची जमीन त्यावरील बांधकामासह शासनाकडे गहाण ठेवण्यात येते. या गहाणपत्रावर दि.०५.१०.१९९३ च्या अधिसूचनेनुसार मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क यामधून सूट देण्यात आलेली आहे. तथापि, शासकीय कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या सहकारी घरबांधणी संस्थांकडून सदनिकांचे बांधकाम चालू असताना समासद कर्मचारी मृत होणे, कौटुंबिक व आर्थिक कारणास्तव राजीनामे देणे अथवा इतर कांही कारणांमुळे सभासदाचे सदस्यत्व रद्द झाल्यास संस्थेत जागा रिक्त होतात. या रिक्त झालेल्या जागी संस्था नवीन सभासदांना सदस्यत्व देते. याप्रकरणी संस्थेची मालमत्ता शासनाकडे गहाण ठेवली असल्यामुळे मृत सभासद किंवा राजीनामा दिलेले सभासद यांची भाग-प्रमाणपत्रे संस्थेस परत केली जातात. वरील कारणांमुळे रिक्त असलेल्या जागी नव्याने सदस्यत्व देण्यात आलेल्या सभासदांना गृहनिर्माण संस्थेमार्फत भाग-प्रमाणपत्रांचे पुनर्वाटप करण्यात येते. सहकारी संस्थेच्या उपविधीनुसार सभासदांचा राजीनामा स्वीकारणे, सभासदत्व रद्द करणे व नवीन सभासद करुन घेणे ही जबाबदारी संस्थेच्या संचालक मंडळाची आहे. नवीन सभासद करताना कोणतेही दस्तऐवज नोंदणीसाठी तयार करण्यात येत नाहीत कारण सदनिकेची कामे पूर्ण झाल्यानंतरही संपूर्ण बांधकामासह जागेची मालकी संबंधित संस्थेचीच असते. सभासदास देण्यात येणारे सभासदत्व हे केवळ भोगवट्यापुरतेच मर्यादित असते. सदस्यांच्या भाग-प्रमाणपत्रावर नवीन सभासदाचे नांव दाखल करताना कोणताही संलेख तयार होत नाही. या परिस्थितीत सदर रिक्त जागांवर नवीन सदस्य कर्मचाऱ्याकडून त्याच्या नांवे निर्माण होणाऱ्या मिळकतीबाबत तसेच भाग-प्रमाणपत्र हस्तांतरणासाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क आकारण्यात यावे किंवा कसे? याबाबत पुनः प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या मुद्यांबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-** शासकीय कर्मचाऱ्यांनी स्थापन केलेल्या सहकारी घरबांधणी संस्थांचे बांधकाम चालू असतांना तसेच संस्थेचे बांधकाम पूर्ण होऊन सभासदांना सदनिकांचे अंतिम वाटप होईपर्यंत (संस्था उभारणीखाली असताना) संस्थेचे सभासद मृत होणे, वैयक्तिक,






Scanned by CamScanner

SELF ATTESTED

BY ME

कौटुंबिक व आर्थिक कारणास्तव राजीनामा देणे तसेच इतर कांही कारणास्तव सभासदांचे सभासदत्व रद्द होणे यामुळे संस्थेत रिक्त होणाऱ्या जागी नवीन सभासदांना सभासदत्व देण्यात येते. अशा परिस्थितीत घरबांधणी संस्थेकडे उपलब्ध असलेल्या सदनिकांच्या प्रमाणात नवीन येणाऱ्या सदस्यांना घरबांधणी संस्थेचे भाग-प्रमाणपत्रे (SHARES) घरबांधणी संस्था वाटप / पुनर्वाटप (REALLOTMENT OF SHARES) करीत असते. या प्रकरणी कोणत्याही प्रकारे प्रत्यक्षात खरेदी-विक्री व्यवहार होत नाही. त्यामुळे नवीन येणाऱ्या सदस्यांच्या नांवे विक्री करार (SALE DEED) होत नसून त्यांना प्रत्यक्षात सदनिकेचा ताबा देण्यात येत नाही म्हणून याप्रकरणी मुद्रांक शुल्क लागू होत नाही.

सदरचे आदेश महसूल व वन विभागाच्या तसेच विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्रमांक २६/म-१, दि.२९.०८.२००७ व क्रमांक ४४५/१५६८/अे शाखा, दि.०६.०९.२००७ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,

( दि. बा. पाटील )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :-

०१. ...धान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
०२. ...महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
०३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
०४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
♦ ०५. राज्यपालांचे सचिव
०६. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
०७. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
०८. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
०९. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
१०. अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
♦ १४. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
♦ १५. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
♦ १६. ...यंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मुंबई.
१७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सर्व विभागीय आयुक्त
२०. संचालक, विमा संचालनालय, म्हाडा इमारत, मुंबई-४०० ०५१.
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२३. सर्व मंत्रालयीन विभाग; यांना कळविण्यात येते की सदरचे शासन निर्णय आपल्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख व जिल्हा कार्यालये यांच्या दिनर्शनास आणण्यात यावेत.
२४. महसूल व वन विभाग (म-१ शाखा)
२५. विधी व न्याय विभाग (अ-शाखा)
२६. सहकार विभागातील सर्व कार्यासने
२७. निवड नस्ती, १८-स.
♦ पत्राद्वारे.

नसन-४
दस्त क्र.( ३४०० /२०२०)
१७ — २२

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR ... NASHIK-IV

| Department of Stamp & Registration, Maharashtra | |
|---|---|
| Receipt of Document Handling Charges | |
| PRN 0404202000008 | Date 07/05/2020 |
| Received from Self, Mobile number 9422252939, an amount of Rs.40/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office Joint S.R.Nashik 4 of the District Nashik. | |
| Payment Details | |
| Bank Name IBKL | Date 04/04/2020 |
| Bank CIN 10004152020040400005 | REF No. 2004380832 |
| This is computer generated receipt, hence no signature is required. | |

EXE_11092007.lwp.

Scanned by CamScanner

# घोषणापत्र/शपथपत्र

मी / आम्ही खाली सही करणार मा.नोंदणी महानिरीक्षक म.रा.पुणे यांचे दि ३०/११/२०१३ रोजीचे परिपत्रकानुसार असे घोषित करतो की, नोंदणीसाठी सादर केलेल्या दस्तऐवजातील मिळकत ही फसवणुकीद्वारे अथवा दुबार विक्री होत नाही त्याबाबत याचा आम्ही अभिलेख शोध घेतलेला आहे. दस्तातील लिहुन देणार / कुलमुखत्यारधारक हे खरे असुन आम्ही स्वतः खात्री करुन घेतलेली आहे / आहोत.

सदर नोंदणीचा दस्तऐवज निष्पादित करतांना नोंदणी प्रक्रीयेनुसार आमच्या जबाबदारीने मी / आम्ही दस्तातील मिळकतीचे मालक / वारस हक्कदार / कब्जेदार / हितसंबंधीत व्यक्ती यांची मालकी (Title) तसेच मिळकतीचे मालकाने नेमुन दिलेल्या कुलमुखत्यारधारक (P.A.Holder)लिहुन देणार हे ह्यात आहेत व उक्त मुखत्यारपत्र अद्यापही अस्तित्वात आहे व आजपावेतो रद्द झालेले नाही याची मी / आम्ही खात्री देत आहोत.तसेच सदरची मिळकत शासन मालकीची नाही व मिळकतीतील इतर हक्क,कर्ज,बँक बोजे, विकसन बोजे, शासन बोजे व कुलमुखत्यारधारकांनी केलेले व्यवहाराच्या अधीन राहुन आमचा आर्थिक व्यवहार पुर्ण करुन साक्षीदार समक्ष निष्पादित केलेला आहे.

सदर दस्तऐवज हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसारच नोंदणेस दाखल केलेला आहे. दस्तातील संपुर्ण मजकुर, निष्पादक व्यक्ती साक्षीदार व सोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता तपासली आहे. दस्ताची सत्यता, वैधता, कोर्ट मनाई हुकुम, कोर्ट दावा या कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक व कबुलीधारक हे संपुर्णपणे जबाबदार राहतील.

या दस्तासोबत नोंदणी प्रक्रियेमध्ये जोडण्यात आलेली पुरक कागदपत्रे ही खरी आहेत व मिळकतीच्या हस्तांतरणाबाबत कोणत्याही सक्षम अधिकारी / मा.न्यायालय / मा.उच्च न्यायालय यांचा मनाई हुकुम नाही. तसेच महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे नियम ४४ नुसार बाधित होत नाही याची मी / आम्ही खात्री देत आहोत.

नोंदणी नियम, १९६१ चे नियम ४४ व वेळोवेळी मा.न्यायालयाचे / मा. उच्च न्यायालयाने दिलेला निर्णयानुसार दस्तऐवजामधील मिळकतीचे मालक / कुलमुखत्यारधारक यांनी मालकी व दस्तऐवजाची वैधता तपासणे ही नोंदणी अधिकारी यांची जबाबदारी नाही, याची आम्हांस पुर्णपणे जाणीव आहे.

स्थावर मिळकतीविषयी सध्या होत असलेली फसवणुक / बनावटीकरण / संगनमत व त्या अनुषंगाने पोलीस स्टेशनमध्ये दाखल होत असलेले गुन्हे हे माझ्या दस्तऐवजातील मिळकतीविषयी होऊ नयेत म्हणुन आम्ही दक्षता घेतलेली आहे. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ नुसार मी / आम्ही नोंदविण्यात अलेल्या व्यवहारास कायद्यानुसार मुद्रांक शुल्क किंवा नोंदणी फी कमी लावली / बुडविली गेली असल्यास अथवा नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ नुसार कोणत्याही प्रकारचा कायदेशिर प्रश्न उद्भवल्यास त्यास मी / आम्ही व दस्तऐवजातील सर्व निष्पादक जबाबदार रहाणार आहोत. याची आम्हाला पुर्ण कल्पना आहे.

त्यामुळे मी / आम्ही नोंदणी प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारचा गुन्हा घडणारे कृत्य केलेले नाही. जर भविष्यात सदर प्रकरणी कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडल्यास मी / आम्ही नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ व भारतीय दंड संहिता १८६० मधील तरतुदीनुसार ७ वर्षाच्या शिक्षेस पात्र राहणार आहोत याची मला / आम्हाला पुर्णपणे जाणीव आहे. त्यामुळे हे घोषणापत्र / शपथपत्र दस्ताचा भाग म्हणुन जोडत आहोत.

लिहुन घेणार

लिहुन देणार...

नसन-४

दस्त क्र. ( 3४00 /२०२०)

९८ — २२

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NASHIK-IV

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-४

Scanned by CamScanner